**महाराष्ट्र शासन**

**उच्च शिक्षण संचालनालय**

**शिक्षण शुल्क समिती, मुंबई**

(राज्यातील विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित शिक्षणशास्त्र व शारिरीक शिक्षणशास्त्र महाविद्यालयांसाठी)

कार्यालयाचा पत्ता- शासकीय अध्यापक महाविद्यालय, एलफिन्स्टन तांत्रीक विद्यालय आवार,

१ ला मजला, ३ महापालिका मार्ग, धोबी तलाव, मुंबई-४०० ००१

Web:www.mahasss.in Tel-022 20824478 E-mail : jd.hesss-mh@gov.in


# शिक्षण शुल्क समितीच्या दि.१४-०८-२०२४ च्या बैठकीचे इतिवृत्त

शिक्षण शुल्क समितीची बैठक दि.१४-०८-२०२४ रोजी स.११.०० वाजता मा. अध्यक्ष, शिक्षण शुल्क समिती, मुंबई तथा मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय यांचे अध्यक्षतेखाली मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्या दालनात आयोजित करण्यात आली होती. शिक्षण शुल्क समितीच्या बैठकीस खालील सदस्य/अधिकारी उपस्थित होते.

| अ.क्र. | उपस्थित अधिकारी/ पदाधिकारी | पदनाम |
|---|---|---|
| १ | मा.श्री. विकास चंद्र रस्तोगी, मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग | अध्यक्ष |
| २ | मा.श्री. बबन माळी, उपसचिव, वित्त विभाग (मा.प्रधान सचिव, वित्त विभाग, मंत्रालय यांचे प्रतिनिधी) | सदस्य |
| ३ | डॉ. श्रीनिवास धुरे, प्राचार्य, सिडनहॅम वाणिज्य व अर्थशास्त्र महाविद्यालय, मुंबई | सदस्य |
| ४ | डॉ. नलिनी पाटील-सदस्य, खाजगी शिक्षक प्रशिक्षक संघटनेचा प्रतिनिधी (शिक्षणशास्त्र) तथा प्राचार्य, एस.एन.डी.टी. कॉलेज ऑफ एज्युकेशन, पुणे | सदस्य |
| ५ | डॉ. महेश देशपांडे - खाजगी शिक्षक प्रशिक्षक संघटनेचे प्रतिनिधी (शारीरिक शिक्षणशास्त्र) तथा सहयोगी प्राध्यापक, चंद्रशेखर आगाशे शारीरिक शिक्षण महाविद्यालय, पुणे | सदस्य |
| ६ | मा. डॉ. शैलेन्द्र देवळाणकर, प्र. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे (ऑनलाईन उपस्थिती) | सदस्य सचिव |
| ७ | श्री. हरिविजय शिंदे, सहसंचालक, शिक्षण शुल्क समिती, मुंबई | सदस्य |

तसेच बैठकीस खालील विशेष निमंत्रित उपस्थित होते.

| अ.क्र. | उपस्थित विशेष निमंत्रित | पदनाम |
|---|---|---|
| ८ | श्री. एस. ए. सोनवणे, सहयोगी प्राध्यापक, सेकंडरी ट्रेनिंग कॉलेज ऑफ एज्युकेशन, मुंबई | शिक्षणशास्त्र विषयाचे तज्ज्ञ |

| | | |
|---|---|---|
| ९ | डॉ.राजेंद्र ढाकणे, सह.प्राध्यापक, शारीरिक शिक्षणशास्त्र महाविद्यालय, मुंबई | शारीरिक शिक्षणशास्त्र विषयाचे तज्ञ |
| १० | श्रीमती वैशाली बापट, खर्च लेखापाल, वांद्रे (पूर्व), मुंबई | प्रस्ताव तपासणी खर्च लेखापाल |
| ११ | श्री. कैलाश गांधी, खर्च लेखापाल,मे.कैलाश गांधी अँन्ड असोसिएट्स, वाशी, नवी मुंबई | प्रस्ताव तपासणी खर्च लेखापाल |
| १२ | डॉ. श्रीनिवास दराडे, संस्था प्रतिनिधी, कामधेनू शिक्षण संस्था, छत्रपती संभाजीनगर | निमंत्रित सदस्य |

श्री. व्ही. बी. शर्मा- सनदी लेखापाल तथा व्ही. बी. शर्मा अँन्ड कं, चार्टर्ड अकाऊन्टन्ट्स गोंदिया यांनी बैठकीस उपस्थित राहू शकत नसल्याबाबत ईमेलवरून कळविले आहे.

बैठकीच्या सुरूवातीस सहसंचालक, शिक्षण शुल्क समिती तथा सदस्य यांनी उपस्थितांचे स्वागत करून बैठकीच्या आयोजनाबाबतची प्रस्तावना केली. सदर बैठकीत विषयपत्रिकेनुसार खालील विषयाबाबत चर्चा व निर्णय झाले.

**विषय क्र.०१:- राज्यातील शिक्षणशास्त्र व शारिरीक शिक्षणशास्त्र महाविद्यालयांकडून प्राप्त झालेल्या शै. वर्ष २०२४-२५ करिताच्या तज्ज्ञांकडून तपासणी झालेल्या २९३ महाविद्यालयाच्या शुल्कास मान्यता मिळणेबाबत.**

सन २०२४-२५ करिता शुल्क निश्चितीकरिता प्राप्त झालेल्या प्रस्तावांपैकी तज्ज्ञांकडून तपासून प्राप्त झालेले २९३ प्रस्ताव समितीपुढे शुल्क निश्चितीसाठी सादर करण्यात आले. शिक्षण शुल्क समितीच्या नियमावलीतील मुद्दा क्र.२.१.२ Salary of Employees (Teaching &Non- teaching) paid through Bank Accounts only will be considered for calculation of fee. salary paid in cash will be disallowed. असे नमुद केलेले आहे. या नियमाच्या अनुषंगाने महाविद्यालयांनी वेतनावरील खर्च हा पूर्णत: बँकेमार्फत करणे आवश्यक होते. महाविद्यालयाच्या बँकेमार्फत अदा केलेल्या वेतनाच्या अनुषंगाने परिगणना करून आलेले शुल्क किंवा समितीने निश्चित करून दिलेल्या अंतिम मंजूर शुल्कात २० टक्के वाढ करून आलेले शुल्क यापैकी जे कमी असेल ते शुल्क मंजूर करणेबाबत निर्णय घेण्यात आला.

तसेच ज्या महाविद्यालयांनी विकास शुल्क, विकास योजना व विकास शुल्क जमा करण्याकरिता नवीन बँक खाते क्रमांक सादर केला आहे, अशाच महाविद्यालयांचे विकास शुल्क(Devlopment Fee) मंजूर करणेबाबत निर्णय घेण्यात आला. अंतिम मंजूर शिक्षण व विकास शुल्क परिशिष्टनिहाय नमुद केलेले आहे.

परिशिष्ट अ -बी.एड- २४५ महाविद्यालये
परिशिष्ट ब-एम.एड- २० महाविद्यालये
परिशिष्ट क-बी.पी.एड- १९ महाविद्यालये

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 129 | 132 | Shri Balaji Adhyapak Mahavidiyal,Washim Akola Highway Nh-161 E Jambhrun (Parande) Washim, Dist Washim | 34613 | 17307 | 0 |
| 130 | 133 | P R Patil Shikshan Mahavidyalay,,Plot No 281 Kakaddara Talegaon Sp,Dist-Wardha | 45571 | 22786 | 0 |
| 131 | 134 | Dnyanada College Of Education ,Bhiwapur Ward Near R K Chowk Chandrapur | 2978 | 1489 | 0 |
| 132 | 135 | Late Shri Dnyaneshwarji Menghare Shikshan Mahavidyalaya (B.Ed.),At-Post-Kosra-Kondha, Tah-Pauni, Dist-Bhandara | 50598 | 25349 | 0 |
| 133 | 136 | Late Shri Dnyaneshwarji Menghare Shikshan Mahavidyalaya (B.Ed.,At-Post-Desaiganj (Wadsa), Tah-Desaiganj (Wadsa), Dist-Gadchiroli | 39923 | 19962 | 0 |
| 134 | 137 | Chintamani B.Ed College Ballarpur,Dist - chandrapur | 61051 | 30526 | 3205 |
| 135 | 138 | Jagat Prakash B.Ed. College,Near Of Mohammad Ali Petrol Pump, Kamptee Road,Dist-Nagpur | 53 | 27 | 0 |
| 136 | 139 | Suyash College Of Education, Vaibhav Nagar, Narsala Road, Dighori, Umred Road, Nagpur | 48[illegible] | 24245 | 2715 |
| 137 | 140 | Jayawantrao Sawant College Of Education (B.Ed.),Sr.No. 58, Indrayani Nagar, Handewadi Road, Hadapsar, Pune. | 76507 | 38254 | 0 |
| 138 | 141 | Shri Sai Shikshan Mahavidyalay, Chandrapur | 44878 | 22439 | 2289 |
| 139 | 142 | Late Lalasaheb Deshmukh College Of Education Tiwsa, Dist Amravati | 23878 | 11939 | 0 |
| 140 | 144 | Shri Balaji Shikshan Prasarak Mandal'S Adhyapak Mahavidhyalaya,Ring Road Shepwadi Ambajogai,Dist-Beed | 35372 | 17686 | 0 |
| 141 | 145 | Kesharbai College Of Education Achalpur,Govardhan Vihar Kandali-Paratwada,Dist-Amravati | 38194 | 19097 | 1910 |
| 142 | 146 | Vandaniya Rashtrasant Tukodoji Maharaj Shikshan Mahavidyalaya ,Near Gov. Iti Daryapur Road Anjangaon Surji,Dist-Amravati | 31294 | 15647 | 1565 |
| 143 | 147 | Late. Govindrao Wanjari College Of Education,156, Borkhedi (Gate) Butibori, Nagpur | 44992 | 22496 | 0 |

JT. DIRECTOR SHIKSHAN SHULKA SAMITI